# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८(१) अन्वये आदेश.

जा.क्र.वि-१/ सोसा./क.७८(१)/प्रसा.नि.आदेश/२०१७
उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक, तालुका नाशिक,
याचे कार्यालय, सहकार संकुल, नॅशनल ऊर्दू हायस्कूल
जवळ, सारडा सर्कल, नाशिक.
दिनांक २०/०९/२०१७

**वाचावे :-** १) दि बॉबे शुगर मर्चटस आरोग्यधाम को ऑप हौसिंग सोसायटी लि. नाशिक ता जि नाशिक या संस्थेच्या ०१ ते ०५ संचालकांनी या कार्यालयास सादर केलेले राजीनामे.

२) या कार्यालयाकडिल कारणे दाखवा नोटीस जा.क्र.विकास-१/बॉबेशुगरहौसोसा/क.७८/ का दा नो/१७, दिनांक ११/७/२०१७.

३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ (१) मधील तरतुद.

ज्याअर्थी, दि बॉबे शुगर मर्चटस आरोग्यधाम को ऑप हौसिंग सोसायटी लि. नाशिक,ता जि नाशिक, (जिचा उल्लेख यापुढे 'संस्था' असा केला आहे) ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ (ज्याचा उल्लेख यापुढे 'अधिनियम' व 'नियम' असा केला आहे) अन्वये नोंदविण्यात आलेली सहकारी संस्था आहे. सदर संस्थेचे कामकाज अधिनियम, नियम, संस्थेने स्विकारलेल्या पोटनियमातील तरतुदी तसेच शासकीय मार्गदर्शक सुचनानुसार चालविणे संस्थेच्या संचालक मंडळावर बंधनकारक आहे.

२/- ज्याअर्थी, संस्थेचे सभासदांचे तक्रार अर्जाचे अनुषंगाने व संस्थेच्या कामकाजाचे अनुषंगाने, सदर संस्थेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ अे अन्वये तपासणी आदेश पारित करण्यात येऊन, श्री अे एफ बच्छाव, लेखापरिक्षक, सहकारी संस्था,नाशिक यांची तपासणी अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यांत आलेली होती.

३/- ज्याअर्थी, श्री अे एफ बच्छाव, लेखापरिक्षक, सहकारी संस्था,नाशिक यांनी प्रस्तुत संस्थेची कलम ८९ (अे) अन्वये तपासणी करुन अहवाल या कार्यालयास सादर केला होता. सदर अहवालातील संस्थेने कामकाज करताना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदी व उपविधीत नमुद केलेल्या नियमाचे उल्लंघन केल्याबाबतच्या निष्कर्षानुसार या कार्यालयाने, वाचावे क्रं. ०२ मध्ये नमुद कलम ७८ (१) अन्वये कारणे दाखवा नोटीस संस्थेचे पदाधिकारी यांना निर्गमीत करुन, सदर नोटीसीत नमुद मुददे क्र.०१ ते १६ चे अनुषंगाने खुलासा सादर करणेबाबत दिनांक ११/७/२०१७ च्या नोटीसीने कळविण्यात आलेले होते.

४/- ज्याअर्थी, सदर कारणे दाखवा नोटीस त्यांना पोस्टाने पाठवुन आपले म्हणणे मांडणेकामी दिनांक ०५/८/२०१७ रोजी या कार्यालयात उपस्थित राहणेबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७८ अन्वये नोटीस पाठविण्यांत आलेली होती.

५/- ज्याअर्थी, प्रस्तुत प्रकरणांत या कार्यालयात दिनांक ०५/८/२०१७ ,२९/८/२०१७, १२/९/२०१७ व दिनांक १९/९/२०१७ रोजी ठेवण्यांत आली होती. प्रस्तुत संस्थेचे पदाधिकारी यांचेवतीने या कार्यालयास दिनांक २९/८/२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीसीत नमुद मुददयांचे अनुषंगाने खुलासा प्राप्त झालेला आहे.

६/- कारणे दाखवा नोटीसीतील मुद्दे, व संघीय संस्थेचे म्हणने खालील प्रमाणे आहे.

**कारणे दाखवा नोटीसीतील मुद्दे :-**

७/- ज्याअर्थी, नमूद संस्थेचे कलम ८९ अे अन्वये प्राप्त अहवालातील निष्कर्षानुसार संस्थेच्या कामकाजाचे अनुषंगाने, खालील नमुद ०१ ते १६ मुददयांचे अनुषंगाने खुलासे मागविण्यांत आलेले होते, ते खालील प्रमाणे.

१) श्री नेमचंद छेडा हे संस्थेचे सभासद नसुन त्यांच्या नावावर संस्थेच्या जागेतील प्लॉट अथवा इमारतीमधील फ्लॅट नाही, तरीही त्यांची संस्थेचे सेक्रेटरी म्हणुन निवड करण्यात आलेली आहे व ते संस्थेचे सेक्रेटरी म्हणुन कामकाज पहात आहेत.

२) संस्था अधिनियम, नियम व संस्थेची उपविधी यांचे पालन योग्य रितीने पालन करत नाही.

३) संस्थेचे सन २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या कालावधीचे कॅशबुक (रोककिर्द) तपासणीसाठी उपलब्ध करुन दिले नाही. संस्थेचा कारभार सुयोग्य व्यापारी तत्वानुसार चालविला जात नाही

Scanned by CamScanner

४) सहकारी संस्था तत्वाचे अधिनियमाच्या तरतुदी, आणि त्याखाली तयार करण्यात आलेले नियम यानुसार राज्य शासनाने दिलेल्या निर्देशक तत्वाचे आणि निर्देशांचे अनुपालन करीत नाही.

५) संस्थेने मागील पाच वर्षाचे दोष दुरुस्ती अहवाल मंजुर करुन कार्यालयास सादर केलेले नाहीत.

६) संस्थेने अभिलेख आणि लेखापुस्तके योग्य नमुण्यात ठेवलेली नाहीत.

७) तपासणी मुदतीत तक्रार अर्ज पहाता, रु २५०००/- वरील खर्चांना व त्यापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मागील पाच वर्षामध्ये मंजुरी घेण्यात आलेली नाही. उदा सन २०१३-१४ या वर्षाकरिता रु १७९८८७/- तसेच सन २०१४-१५ या वर्षाकरीता रु ८६४९५२/- सदरची बाब ही बेकायदेशिर आहे.

८) संस्थेचे नोंदणीकृत पत्त्यावर कार्यालय नसल्याचे तपासणीवेळी आढळुन आलेले आहे.

९) संस्थेच्या मागील पाच वर्षात मासिक सभा व वार्षिक सभा या नोंदणीकृत पत्त्यावर घेण्यात आलेल्या नसुन, नवी मुंबई-वाशी येथे घेण्यात आलेल्या आहेत. सदरची बाब ही बेकायदेशिर आहे.

१०) संस्थेच्या कार्यक्षेत्रात दोन हॉल मध्ये भोजनालय हॉल असुन, सदर भोजनालय हे अनधिकृत विनापरवानगीने चालविले जाते.

११) संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणुक ही दिनांक ११/८/२०१२ रोजी झालेली असुन, सदर निवडणुक ही खात्याचे विनापरवानगीने झालेली आहे.

१२) मेंटेनन्सची रक्कम वसुल न करणे, मेंटेनन्स रजिस्टर न ठेवणे.

१३) वार्षिक सभा इतिवृत्त संस्थेने प्रमाणित न करणे, सदर इतिवृत्त हे संगणीकृत करुन, संस्थेच्या लेटरहेडवर चिटकविण्यात आलेले आहे.

१४) संस्थेची गुंतवणुक ही संस्थेच्या कार्यक्षेत्राबाहेर करणे.

१५) संस्थेचे लेखापरिक्षण झाल्यानंतर विहित मुदतीत अथवा अद्यापपर्यंत दोष दुरुस्ती अहवाल सादर केलेला नसल्याने, सर्व संबंधित कसूरदार आहेत.

१६) संस्थेच्या सभासदांना सभेचा अजेंडा विहीत मुदतीत न पाठविणे, व इतर अनेक तक्रारीं प्राप्त झालेल्या आहेत.

संस्थेने उपरोक्त नमुद मुददयांबाबत सादर केलेला खुलासा पहाता, संस्थेचे कामकाज हे सभासद नसलेली व्यक्ती श्री नेमीचंद छेडा यांनी पाहिलेले आहे. संस्थेच्या मासिक व वार्षिक सर्वसाधारण सभा या संस्थेच्या कार्यक्षेत्रात न घेता संस्थेच्या कार्यक्षेत्राबाहेर म्हणजेच मुंबई येथे घेतलेल्या आहेत, संस्थेच्या भोजनालयास परवानगी घेतलेली नाही, संस्थेची गुंतवणुक ही कार्यक्षेत्राबाहेर केलेली असुन, त्यास या कार्यालयाची कोणतीही परवानगी घेतलेली नाही, यामुळे संस्थेची पर्यायाने, सभासदांचे हित धोक्यात आणण्याची कृती पदाधिकारी यांनी केली आहे.

उपरोक्तप्रमाणे संस्थेच्या पदाधिकारी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीं तसेच संस्थेच्या मंजुर उपविधीतील तरतुदीचे पालन न करता कामकाज केल्याचे स्पष्ट झालेले आहे.

ही बाब विचारात घेता, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ (१) मधील तरतुद प्रस्तुत संस्थेच्या संचालक मंडळाच्या बाबतीत प्रभावीत होत असल्याचे सकृत दर्शनी निदर्शनास येते.

७/- ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीं तसेच संस्थेच्या मंजुर उपविधीतील तरतुदींचे पालन न करता संस्थेच्या पदाधिकारी यांनी नियमबाहय कामकाज केल्याचे स्पष्ट झालेले असल्याने, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ (१) मधील तरतुद संस्थेच्या संचालक मंडळाच्या बाबतीत प्रभावीत होते.

**संघीय संस्थेचे अभिप्राय :-**

८/- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ (१) मधील तरतुदीनुसार, नमूद संस्थेच्या संचालक मंडळा विरुध्द प्रस्तावित केलेली प्रस्तुत कार्यवाही विषयी नमूद संस्थेची संघीय संस्था या नात्याने नाशिक जिल्हा सहकारी हौसिंग फेडरेशन व नाशिक तालुका सहकारी हौसिंग फेडरेशन याना कारणे दाखवा नोटीसीची प्रत पृष्ठाकित करुन त्यांना त्यांचे अभिप्राय १५ दिवसांत तसेच दिनांक ०५/०८/२०१७ पूर्वी सादर करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या होत्या. तथापी संघीय संस्थेने या आदेशाच्या तारखे पावेतो अभिप्राय सादर केलेले नाही.

**निष्कर्ष :-**

९/- संस्थेचे कारणे दाखवा नोटीसीतील मुद्दे, सुनावणी दरम्यान संस्थेने सादर केलेला खुलासा व या प्रकरणी माझे समोर सादर केलेली कागदपत्रे यांचा विचार करुन या प्रकरणी मी काढलेले निष्कर्ष खालील प्रमाणे आहे.

१. संस्थेचे कामकाज हे सभासद नसलेली व्यक्ती श्री नेमीचंद छेडा यांनी पाहिलेले आहे.

Scanned by CamScanner

२. संस्थेच्या मासिक व वार्षिक सर्वसाधारण सभा या संस्थेच्या कार्यक्षेत्रात न घेता संस्थेच्या कार्यक्षेत्राबाहेर म्हणजेच मुंबई येथे घेतलेल्या आहेत.

३. संस्थेच्या भोजनालयास परवानगी घेतलेली नाही.

४. संस्थेची गुंतवणुक ही कार्यक्षेत्राबाहेर केलेली असुन, त्यास या कार्यालयाची कोणतीही परवानगी घेतलेली नाही. यामुळे संस्थेची पर्यायाने, सभासदांचे हित धोक्यात आणण्याची कृती पदाधिकारी यांनी केली आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेता,महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे ७८ (१) मधील तरतुद प्रस्तुत संस्थेच्या संचालक मंडळाच्या बाबतीत प्रभावीत होते.

१) उपरोक्त परिस्थितीत जेथे समिती किंवा समितीचा सदस्य तिची किंवा त्यांची कार्ये पार पाडण्याचे नाकारीत असेल किंवा ती पार पाडणे थांबवले असेल किंवा संस्थेचे कामकाज ठप्प झाले असेल किंवा होण्याची शक्यता असेल तर, निबंधक समितीला किंवा यथास्थिती सदस्यांना दूर करु शकेल, संस्थेचा कारभार चालविण्यासाठी त्या समितीच्या जागी प्राधिकृत अधिकारी नियुक्त करु शकेल अशी तरतुद असल्याने, सदर तरतुदीनुसार प्रस्तुत संस्थेवर प्राधिकृत अधिकारी नियुक्त करणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे.

२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८(१) मध्ये " निबंधकाच्या मते समिती ही तिची कर्तव्ये पार पाडण्यात सतत कसुर करीत असेल किंवा तिची कर्तव्ये पार पाडण्यात नष्काळजीपण करीत असेल किंवा अन्यथा तिची कामे उचितरीत्या आणि साक्षेपाने पार पाडीत असेल ,किंवा समितीच्या सदस्यांचा राजीनामा, निरर्हता यामुळे किंवा अन्यथा समितीच्या रचनेत कवा कार्यात दोष असेल तर, निबंधक, नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासुन १५ दिवसाच्या आंत समितीला कारणे लेखी सादर करण्याची कोणतीही असल्यास,संधी दिल्यानंतर आणि म्हणणे मांडण्याची बाजवी संधी दिल्यानंतर व ती संस्था जिच्याशी संलग्न असेल, त्या संघीय संस्थेशी विचार विनिमय केल्यानंतर, नोटीसीमध्ये नमुद केलेले आरोप सकृतदर्शनी आढळुन येत आहेत, परंतु त्यावर उपाययोजना करणे शक्य आहे या निष्कर्षाप्रत आला असेल तर तो आदेशाव्दारे, (एक) आदेशात विनिर्दीष्ट करण्यांत येईल त्याप्रमाणे सहा महिन्याहुन अधिक नसेल अशा तात्पुरत्या कालावधीसाठी अशा समितीला काम करण्यापासन रोखु शकेल आणि (२) संस्थेचा कारभार चालविण्यासाठी, त्या समितीच्या जागी प्राधिकृत अधिकारी किंवा संस्थेच्या तीन किंवा अधिक सदस्याचा अशा प्रकारे रोखुन ठेवलेल्या समितीचे सदस्य असणार नाहीत, समावेश असलेली प्राधिकृत अधिकारी समिती नेमू शकेल किंवा प्राधिकृत अधिकारी किंवा प्राधिकृत अधिकारी ज्या संस्थेचे सदस्य असण्याची आवश्यकता नाही, समिती नेमू शकेल. " अशी तरतुद नमुद आहे.

३) या प्रकरणी संघीस संस्थेस अभिप्राय सादर करण्याच्या सुचना देऊन देखील त्यांनी अभिप्राय सादर केलेले नाही. त्यामुळे या कार्यालयाने प्रस्तावित केलेल्या कारवाईस त्यांची सहमती असल्याचे स्पष्ट होते.

१०/- नमूद संस्थेचे समिती सदस्य त्यांना नेमून दिलेली कर्तव्य पार पाडण्याचे नाकारीत असल्याने, सदर संस्थेचे संचालक मंडळ निष्प्रभावित करुन संस्थेचा कारभार चालविण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ (१) अन्वये प्राधिकृत अधिकारी नियुक्त करणे व प्राधिकृत अधिकारी करवी संस्थेची नविन समिती गठीत करणे संस्थेच्या व सभासदाच्या हिताचे होईल, या निष्कर्षाप्रत हे कार्यालय आलेले असल्याने मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ (१) मधील तरतुदी नुसार, दि बॉबे शुगर मर्चटस आरोग्यधाम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. देवळाली कॅंप, ,लॅमरोड,ता जि नाशिक, या संस्थेचे संचालक मंडळ निष्प्रभावीत करण्याचा आदेश देत असुन, संस्थेचा कारभार चालविण्यासाठी या कार्यालयाचे आस्थापनेवरील श्री. आर सी गजरे,सहकार अधिकारी, अधिन-उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक तालुका, नाशिक यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नेमणूक करीत आहे. प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेच्या समितीची निवडणूक प्रक्रिया सहा महिन्याच्या आंत राबवून नवनियुक्त समितीकडे पदभार सोपविण्याची कार्यवाही करावी.

सदरचा आदेश आज दिनांक २०/०९/२०१७ रोजी माझे सही व कार्यालयिन मुद्रेसह दिला असे

दिनांक २०/०९/२०१७

ठिकाण- नाशिक

( संजय गिते )

उपनिबंधक

सहकारी संस्था, नाशिक तालुका, नाशिक.

Scanned by CamScanner

१. श्री किर्ती ए पारेख, माजी चेअरमन, दि बॉबे शुगर मर्चंटस आरोग्यधाम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.देवळाली कॅप,कोठारी सॅनेटिरीयम जवळ,लॅमरोड,देवळाली कँप,नाशिक-४२२४०१
२. श्री विजय ए पारेख,माजी संचालक, दि बॉबे शुगर मर्चंटस आरोग्यधाम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.देवळाली कॅप,कोठारी सॅनेटिरीयम जवळ,लॅमरोड,देवळाली कँप,नाशिक-४२२४०१
३. श्री. विपुल शहा, माजी व्हा चेअरमन, दि बॉबे शुगर मर्चंटस आरोग्यधाम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.देवळाली कॅप,कोठारी सॅनेटिरीयम जवळ,लॅमरोड,देवळाली कँप,नाशिक-४२२४०१
४. श्री. मुकेश ठाकुर,माजी खजिनदार, दि बॉबे शुगर मर्चंटस आरोग्यधाम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.देवळाली कॅप,कोठारी सॅनेटिरीयम जवळ,लॅमरोड,देवळाली कँप,नाशिक-४२२४०१
५. सौ रेखा टी गाला,माजी संचालक, दि बॉबे शुगर मर्चटस आरोग्यधाम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.देवळाली कॅप,कोठारी सॅनेटिरीयम जवळ,लॅमरोड,देवळाली कँप,नाशिक-४२२४०१

**सर्व राहणार** – दि बॉबे शुगर मर्चंटस आरोग्यधाम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. देवळाली कॅप,लॅमरोड,ता जि नाशिक,

२/- त्यांना सुचित करण्यात येते की, संस्थेचे दप्तर व व्यवस्थापन प्रशासक यांचे कडे सुपूर्द करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

१) श्री. आर सी गजरे, प्राधिकृत अधिकारी, दि बॉबे शुगर मर्चंटस आरोग्यधाम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. देवळाली कॅप, ,लॅमरोड,ता जि नाशिक, तथा- सहकार अधिकारी, अधिन उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक तालुका, नाशिक.

२/- त्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी संस्थेच्या कामाकाजाचा पदभार स्विकारुन व सुचना प्रमाणे कार्यवाही करुन तसा अहवाल सादर करावा.

<u>प्रत माहितीस्तव :-</u>

१) शाखाधिकारी, नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नाशिक शाखा ————, नाशिक.
२) कार्यकारी संचालक, नाशिक जिल्हा सहकारी हौसिंग फेडरेशन लि. नाशिक.
३) कार्यकारी संचालक, नाशिक तालुका सहकारी हौसिंग फेडरेशन लि., नाशिक.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१) मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक.
२) मा. जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था, नाशिक.

उपनिबधक
सहकारी संस्था, नाशिक तालुका, नाशिक.

Scanned by CamScanner